महासागर
नागपूर
# वृत्तसागर
▪ शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ ▪

# आंबेडकर भवन त्याच जागेवर बांधा

## बावनकुळे अधिकाऱ्यांवर संतापले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

अंबाझरी उद्यानातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन पाडल्यावरून चांगलाच वाद निर्माण झाला आहे. कंत्राटाला स्थगिती देण्यात आली असून भवन तयार करण्याच्या सूचनाही देण्यात आल्यात. परंतु यंत्रणांकडून अद्याप भवन उभे करण्यात आले नाही. यावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संताप व्यक्त करीत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. कायदा सुव्यवस्था बिघडल्यास तुम्ही जबाबदार राहणार असल्याचे सांगत आंबेडकर भवन हे पाडलेल्याच जागेवर पुन्हा बांधा. सांस्कृतिक भवन बांधले नाही तर प्रकल्प होऊ देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

जिल्हा नियोजन समितीची (डीपीसी) बैठक शुक्रवारी नियोजन भवनात पार पडली. माजी मंत्री तथा आमदार डॉ. नितीन राऊत यांनी हा मुद्दा बैठकीत उपस्थित केला. ते



म्हणाले की, अंबाझरी उद्यानातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन त्याच जागेवर नव्याने बांधण्यात यावे, यासंदर्भातील आदेश मागच्या डीपीसीच्या बैठकीत पालकमंत्र्यांनी दिले होते. परंतु अजुनही त्यावर कारवाई झालेली नाही. यावर पालकमंत्री बावनकुळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली. तेव्हा अधिकाऱ्यांनी सांगितले की, ती जागा टिनाने बंद करण्यात आलेली आहे.

कंपनीचे गार्ड आत जाऊ देत नाही. पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली तेव्हा न्यायालयाची स्थगिती असल्याचा मुद्दा पुढे आले. आमदार परिणय फुके यांनीही त्यांची बाजू उचलून धरत सर्वोच्च न्यायालयात मध्यस्थी करण्याची सूचना केली. त्यावर पालकमंत्री चांगलेच संतापले, ते म्हणाले की, स्थगिती तेथील प्रस्तावित प्रकल्पावर आहे. आंबेडकर भवन बांधण्यावर नाही. आंबेडकर सांसकृतिक भवन पाडले त्याच जागेवर ते नव्याने बांधायचे आहे. त्याला स्थगितीची अडचण येणार नाही. मुख्मंत्र्यांशी यावर चर्चा झालेली आहे. दहा कोटी मंजूर झाले आहे. हे काम तातडीने झाले पाहिजे. महापालिका, पर्यटन विभाग आणि सार्वजनिक बंधकाम विभाग यांनी यासंदर्भात जातीने लक्ष द्यावे, न्यायालयाच्या आदेश समजून घ्यावा आणि हा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, असे आदेश दिले.

आंबेडकर भवन बांधण्यावर होत असलेल्या टाळाटाळीवर पालकमंत्री पालकमंत्री बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यासाठी मोठे आंदोलन झाले आहे. आंबेडकरी जनतेचा जिव्हाळ्याचा मुद्दा आहे. पुन्हा आंदोलन झाले तर काय करणार, नागपुरातील कायदा व सुव्यवस्था बिगडवण्याचा प्रयत्न करू नका, तसे झाल्यास तुम्हालाच जबाबदार धरण्यात येईल, अशा शब्दात त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

# अधिकारी असल्याचे भासवून फसवणुकीचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव वापरून सायबर फसवणूक करण्याचा प्रकार समोर आला आहे. भामट्यांनी स्वतःला सीआयएसएफ कमांडंट आणि मेजर असल्याचे भासवून एका ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला.

शहरातील ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ, कोमहाड (युके) चे कार्यकारी संचालक व भारतीय बालरोग अकादमीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय बोधनकर यांना सकाळी एक फोन कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने स्वतःला सीआयएसएफ कमांडंट असल्याचे सांगत उकरत्र कर्मचाऱ्यांच्या ९० मुलांची वैद्यकीय तपासणी करण्याची विनंती केली. डॉ. बोधनकर यांनी तपासणी मोफत करण्यास सहमती दर्शवली. मात्र, संभाषणादरम्यान कॉल करणाऱ्याने अचानक ५० हजार रुपए आगाऊ रक्कम देण्याची मागणी करत क्यूआर कोड शेअर करण्यासाठी दबाव टाकला.

यानंतर दुसऱ्या व्यक्तीने व्हिडिओ कॉल करून स्वतःला मेजर रावत असल्याचे सांगितले आणि फोनमधील मॅनेज/सेटिंग ऑप्शनवर क्लिक करण्यास सांगितले. यामुळे संशय अधिक बळावला. हे लक्षात येताच सर्व प्रक्रिया तात्काळ थांबवण्यात आली आणि संभाव्य फसवणूक टळली. कॉलच्या वेळी उपस्थित असलेले नियोग थेरेपिस्ट डॉ. प्रवीण डबली यांनी संपूर्ण प्रकार लक्षपूर्वक पाहून हा सायबर फसवणुकीचा प्रयत्न असल्याचा इशारा दिला. त्यांच्या सतर्कतेमुळे कोणताही आर्थिक व्यवहार होण्याआधीच थांबवण्यात आला. यानंतर सर्व संशयास्पद मोबाईल क्रमांक ब्लॉक करण्यात आले. स्क्रीनशॉट, बनावट ओळखपत्रांचे फोटो व मोबाईल नंबरसह सायबर क्राईम विभागाकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली आहे.



भामट्याचे बनावट ओळखपत्र

डॉ. उदय बोधनकर म्हणाले, सायबर भामटे आता लष्कर, पोलीस आणि शासकीय संस्थांची नावे वापरून लोकांच्या भावना हाताशी धरत आहेत. जागरूकता आणि सतर्कताच यावरचा प्रभावी उपाय आहे. डॉ. प्रवीण डबली यांच्या जागरूकतेमुळे मोठी फसवणूक टळली. आपण डिजिटल युगात प्रवेश करत आहोत, त्यामुळे सरकारने अशा मोबाईल क्रमांकांचा माग काढून कठोर कारवाई करावी.

डॉ. उदय बोधनकर यांची सायबर फसवणूक करण्यासाठी भामट्यांनी +91 82695 26647 आणि +91 91097 82793 या मोबाईल क्रमांकांचा उपयोग केला होता. दरम्यान, अनोळखी कॉलवर क्युआर कोड, ओटीपी, बँक किंवा युपीआय माहिती कधीही शेअर करू नका, असे आवाहन केले आहे.

## एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल पब्लीक स्कुलमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबरोबरच त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातुन एकलव्य निवासी शाळेत प्रवेश दिला जातो. यावर्षी विभागातंर्गत १० एकलव्य मॉडेल निवासी शाळेत प्रवेश प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. एकलव्य परीक्षा १ मार्च २०२६ ला असल्याने या निवासी शाळेत इयत्ता ६ वी मध्ये नियमित प्रवेश घेण्यासाठी आणि इयत्ता ७ ते ९ वीच्या वर्गातील अनुसूचित जमातीच्या रिक्त जागांवर प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक अथवा मुख्याध्यापक यांनी नजीकच्या एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाशी संपर्क करून ३० जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज प्राप्त करून घेण्यात यावे. शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळा, जिल्हापरीषद, नगरपालीका, व महानगरपालीकेच्या तसेच इतर शासनमान्य अथवा खाजगी अनुदानित शाळेत शिकत असणारे कोणताही अनुसूचित जमातीचा विद्यार्थी हे आवेदनपत्र भरू शकेल. तसेच इयत्ता ६ वी मध्ये प्रवेशासाठी अनुसूचित जमातीच्या दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी ३ टक्के आणि आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक शाळेत ५ जागा आरक्षित असणार आहेत. विद्यार्थ्याच्या गुणवतेनुसार आणि पालकांच्या मुळ रहिवासाचे ठिकाण तसेच पत्ता विचारात घेऊन नजीकच्या एकलव्य मॉडेल निवासी शाळेत उपलब्ध जागेनुसार प्रवेश देण्यात येईल. अधिक माहितीसाठी संबंधित प्रकल्प कार्यालये यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयुषी सिंह यांनी केले आहे.

## लता मंगेशकर हॉस्पिटलतर्फे फिरता दवाखाना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

आरोग्य चांगले राहण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताण व्यवस्थापन तसेच मद्यपान व धूम्रपान टाळणे आवश्यक आहे. आरोग्य जनजागृतीच्या माध्यमातून समाजाला स्वस्थ जीवन जगण्यासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूरच्या वतीने शासनाच्या आरोग्य सेवा आपल्या दारीच्या धर्तीवर फिरता दवाखाना सुरू करण्यात आला आहे. या फिरत्या दवाखान्यात रक्तदाब, मधुमेह, ताप, सर्दी-खोकला तसेच मोफत वैद्यकीय सल्ला व आवश्यक औषधांचे वितरण करण्यात येणार आहे. यासोबतच नागरिकांना शासकीय आरोग्य योजना, मोफत उपचार सुविधा, महिला व बाल आरोग्य, ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य तसेच जीवनशैलीविषयक आजारांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

## दीड कोटीचे मोबाईल पळविले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

ट्रक चालकाने वाहकासोबत मिळून नागपुरात डिलिव्हरीसाठी गुडगावहून पाठवलेले ७२० महागडे मोबाईल लंपास केले. त्यानंतर ट्रक कापसी भागात सोडून आरोपी पसार झाले. चोरी झालेल्या मोबाईलची एकूण किंमत १ कोटी ५१ लाख रुपये असल्याची माहिती देण्यात आली आहे. या प्रकरणी कळमना पोलिसांनी अश्फाक मुश्ताक खान (रा. कळमना बाजार)च्या तक्रारीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

अश्फाक यांच्या तक्रारीनुसार, ते हरियाणाच्या गुडगाव येथील स्पीडफॉक्स लॉजिस्टिक कंपनीच्या नागपूर युनिटमध्ये सुपरवायझर आहेत. कंपनीच्या गुडगाव येथील कार्यालयातून आरजे-३२/झेडई-५९८६ क्रमांकाच्या ट्रकमधून ७२० मोबाईल नागपूरला रवाना करण्यात आले होते. मात्र माल नागपूरला पोहोचलाच नाही. अश्फाक यांनी याबाबत कंपनीच्या मुख्य कार्यालयाला माहिती दिली. त्यानंतर ट्रॅकरच्या मदतीने शोध घेतला असता ट्रकचे लोकेशन कापसी परिसरात मिळाले. तत्काळ कंपनीच्या दुसऱ्या चालकाला कापसी परिसरात पाठविण्यात आले. त्याने सांगितले की, तेथे केवळ वाहन उभे आहे आणि त्यातील माल गायब आहे. चालक आणि वाहकाचाही पत्ता नाही. यावरून ट्रक चालक व वाहकाने मिळून रस्त्यातच मोबाईल लंपास केले आणि ट्रक परिसरात सोडून पसार झाल्याचे स्पष्ट झाले.

# ६ फेब्रुवारीपासून खासदार भजन स्पर्धेची प्राथमिक फेरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून आयोजित खासदार भजन स्पर्धेची प्राथमिक फेरी ६ ते १२ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष यंदाच्या स्पर्धेची मध्यवर्ती संकल्पना असणार आहे. या स्पधेर्साठी उद्या, शुक्रवार, दि. २३ जानेवारीपासून प्रवेश अर्ज उपलब्ध होणार असून अर्ज सादर करण्यासाठी ३० जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

नागपूरातील सहा विधानसभा क्षेत्रात या स्पर्धेची प्राथमिक फेरी आयोजित करण्यात आली आहे. मध्य नागपूरची प्राथमिक फेरी ६ फेब्रुवारीला शिक्षक सहकारी बँक सभागृहात,



दक्षिण नागपूरची प्राथमिक फेरी ७ फेब्रुवारीला श्री साई मंदिर, अयोध्या नगर येथे, पूर्व व उत्तर नागपूरची प्राथमिक फेरी ९ फेब्रुवारीला श्री हरिहर मंदिर लकडगंज येथे, पश्चिम नागपूरची प्राथमिक फेरी ११ फेब्रुवारीला श्रीराम मंदिर रामनगर, तर दक्षिण पश्चिम नागपूरची प्राथमिक फेरी १२ फेब्रुवारीला छत्रपती सभागृह, वर्धा रोड येथे सकाळी ९ ते ६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धकांना २ गीते ८ मिनिटांच्या आत सादर करायची आहेत. पहिले गीत हे संत ज्ञानेश्वर महाराजांचा अभंग किंवा भक्तीगीत आणि दुसरे विठ्ठलाचा १ अभंग किंवा भक्तिगीत असावे. ही भजन स्पर्धा युवा व ज्येष्ठ अश्या दोन वयोगटात होणार असून युवा वयोगटात ७ तर ज्येष्ठ (३५ ते ७०) वयोगटातून १२ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. खासदार भजन स्पर्धेची महाअंतिम फेरी रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट्ट सभागृहात होणार आहे. यामध्ये २१ भजनी मंडळांना केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

या भजन स्पर्धेच्या नोंदणीसाठी मा. नितीन गडकरी यांच्या खामला चौकातील (देवनगर) जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत संपर्क साधावा, असे आव्हाहन खासदार भजन स्पर्धेचे संयोजक डॉ. श्रीरंग वराडपांडे यांनी केले आहे.

## काटोल रल्वे स्टेशनवर अवैध दारूचा साठा जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

रेल्वे सुरक्षा दलाने आपल्या सतर्क आणि प्रभावी कार्यपद्धतीचे दर्शन घडवत श्वान पथकाच्या सहाय्याने रेल्वे बोगीमधून मोठ्या प्रमाणात अवैध दारूचा साठा जप्त केला आहे.

रेल्वे क्रमांक 16032 च्या बी-3 बोगीमध्ये दोन प्रवासी अवैधरित्या दारू वाहतूक करत असल्याची गोपनीय माहिती रेल्वे पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे आज सकाळी सुमारे ९ वाजता काटोल रेल्वे स्थानकावर रेल्वे सुरक्षा दल आणि डॉग स्क्वॉडच्या मदतीने तपासणी मोहीम राबवण्यात आली. तपासणीदरम्यान बी-3 बोगीतील सीट क्रमांक 47 वर बसलेले गोरेला वान (वय 21) आणि दुला मानस या दोन तरुणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातील एका बॅगमधून 29 दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या असून त्यांची अंदाजे किंमत 96,945 आहे.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणात कोणतीही तडजोड चालणार नाही : साधना सयाम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

प्रत्येक विद्यार्थ्याच्या डोळ्यांत मला एक चमक दिसली. योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास ही मुले निश्चितच पुढे जाऊ शकतात, या शब्दात मनपाच्या शिक्षणाधिकारी साधना सयाम यांनी विद्यार्थ्यांमधील क्षमतेवर आपला विश्वास व्यक्त केला.

नन्हे सितारे या जीवन कौशल्यांवर आधारित उपक्रमाच्या महानगरपालिका स्तरीय अंतिम फेरीच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. शुक्रवारी मोठ्या उत्साहात पार पडलेल्या या सोहळ्याचे आयोजन नागपूर महानगरपालिका, जे. सी. फ्लावर्स, पर्सिस्टन्ट फाउंडेशन आणि ओपन लिंक्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाला मनपाच्या शिक्षणाधिकारी साधना सयाम यांच्यासह उपशिक्षणाधिकारी संजय दिघोरे, दुर्गानगर माध्यमिक शाळेचे मुख्यध्यापक कृष्णा उजवणे. ओएलएफच्या महाराष्ट्र प्रमुख चित्रा खन्ना यांच्यासह इतर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना साधना सयाम म्हणाल्या की, केवळ पुस्तकापुरते शिक्षण पुरेसे नाही, मुलांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर अनुभवाधारित, कौशल्यप्रधान आणि संवेदनशील शिक्षण महत्त्वाचे आहे आणि नन्हे सितारे सारखे कार्यक्रम त्यात भर घालत आहेत. सरकारी शाळांमधील हुशार, जिज्ञासू विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेली सर्व साधनसामग्री आणि पाठबळ शिक्षण विभागाकडून उपलब्ध करून दिले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवण्याची जबाबदारी शिक्षकांवरच आहे, हे अधोरेखित करत त्यांनी शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व नमूद केले. तसेच, बालवाडी शिक्षकांकडून सुरू असलेल्या उत्कृष्ट कामाचे त्यांनी विशेष



कौतुक केले. हे सकारात्मक आणि परिणामकारक कार्य पालकांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचवले गेले पाहिजे, जेणेकरून सरकारी शाळांवरील पालकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असेही त्या म्हणाल्या.

नन्हे सितारे या उपक्रमाचा उद्देश केवळ स्पर्धा आयोजित करणे इतकाच मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास, आत्मविश्वास वाढवणे आणि त्यांच्या सर्जनशील अभिव्यक्तीला व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. डिसेंबर महिन्यात सुरू झालेल्या या उपक्रमाला महानगरातील शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शाळा आणि तालुका स्तरावरील प्राथमिक फेऱ्यांमधून 60 विद्यार्थ्यांची ग्रँड फिनालेसाठी निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे योग्य, पारदर्शक आणि न्याय्य मूल्यमापन व्हावे, यासाठी शिक्षण, साहित्य आणि कायदा क्षेत्रातील अनुभवी व प्रतिष्ठित व्यक्तींनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. या परीक्षकांमध्ये अनुपमा हुँगे, डॉ. कीर्ति पालटकर, डॉ. आश्विन किनारकर, डॉ. शिल्पा सूर्यवंशी, प्रसेनजीत गायकवाड आणि श्री भूपेश चव्हाण यांचा समावेश होता.

# राज्यातील लोकसंख्येत १.१८ टक्के सिकलसेलचे वाहक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

राज्यात वर्ष २०१९ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या साडेसहा वर्षात १ कोटी ५ लाख ८६ हजार ७३३ नागरिकांची सोल्युबिलीटी चाचणी करण्यात आली. यामध्ये १.१८ टक्के जण सिकलसेल वाहक असल्याचे आढळले. तर १२ हजार ४२० नवीन सिकलसेलचे रुग्ण नोंदवले गेले, असे आरोग्य विभागाच्या अहवालातून पुढे आले आहे.

राज्यात सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम २००८ पासून आदिवासी व दुर्गम भागात राबवण्यात येत आहे. ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, पालघर, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, धुळे, जळगाव, बुलढाणा, नांदेड, वाशीम, अकोला, छत्रपती संभाजीनगर, रायगड व हिंगोली या २१ जिल्ह्यांचा त्यात समावेश आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत तपासणी, निदान व उपचार आणि नागरिकांमध्ये जनजागृती, मोफत सोल्युबिलिटी चाचणी, इलेक्ट्रोफोरेसिस व एच.पी.एल.सी. तपासणी, रुग्णांना मोफत औषधे, समुपदेशन, नियमित आरोग्य तपासणी, गरजेनुसार रक्त संक्रमण, टेलिमेडिसीनद्वारे तज्ज्ञांचा सल्ला आदी सुविधा पुरवल्या जातात. वर्ष २०१९ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान राज्यात १ कोटी ५ लाख ८६ हजार ७३३ नागरिकांची सोल्युबिलीटी तपासणी झाली. त्यात १ लाख २४ हजार २७५ (१.१८ टक्के) सिकलसेलचे वाहक आढळले. तर १२ हजार ४२० नवीन सिकेलसेलचे रुग्णही नोंदवले गेले. या आकडेवारीला आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला. राज्यात सिकलसेल मुक्त महाराष्ट्रासाठी अरुणोदय ही विशेष मोहिम १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी राबवली जात आहे. त्यात आरोग्य व कुटुंब कल्याण विभागातर्फे २१ जिल्ह्यातील सर्वच नागरिकांची सिकलसेल तपासणीचे नियोजन करण्यात आल्याचे आरोग्य विभागाचे म्हणणे आहे.

सिकलसेल हा आनुवंशिक रक्त पेशीशी संबंधित आजार असून आई-वडिलांकडून अपत्यांना होतो. सिकलसेल रक्तपेशी या विळ्याच्या आकाराच्या ताठर असल्याने रक्तवाहिन्यात अडथळा निर्माण करतात. त्यामुळे रुग्णाला असह्य वेदना होतात. वारंवार अशा इजा झाल्यास अवयव निकामी होऊ शकतात.

# व्हीएनआयटीने तयार केले कमी वजनाचे बुलेटप्रूफ जॅकेट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :



सैनिकांची हालचाल अधिक सुलभ व्हावी, रणांगणात वेग व चपळता वाढावी यासाठी अतिशय हलक्या बुलेटप्रूफ जॅकेटच्या विकासावर विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (व्हीएनआयटी) काम करत आहे. स्वतंत्र संशोधन प्रकल्पांतर्गत सध्या ७.५ किलो वजनाचे बुलेटप्रूफ जॅकेट विकसित करण्यात आले असून, येत्या काळात हे वजन ६ किलोपेक्षाही कमी करण्याचे उद्दिष्ट संशोधकांनी ठेवले आहे.

ॲल्युमिनियम आणि संमिश्र (कॉम्पोझिट) पदार्थांच्या वापरातून तयार करण्यात आलेल्या या जॅकेटची ७.६२ मिमी कॅलिबरच्या गोळ्यांनी यशस्वी चाचणी करण्यात आली आहे. संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, सध्या वापरात असलेली जड जॅकेट सैनिकांच्या हालचालींवर मर्यादा आणतात. त्यामुळे वजन कमी करताना संरक्षणक्षमतेत कोणतीही तडजोड होऊ नये, याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

ही संकल्पना नुकत्याच झालेल्या मिलिटरी-सिव्हिलियन फ्युजन (एमसीएफ) परिषदेत मांडण्यात आली. या परिषदेत लष्कर, संरक्षण क्षेत्र आणि नागरी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. रणभूमीवर सैनिकांना वेगवान हालचाल करता यावी, यासाठी बुलेटप्रूफ जॅकेटचे वजन अत्यंत महत्त्वाचे ठरते. हलके जॅकेट म्हणजे अधिक सुरक्षितता आणि कार्यक्षमता, असे मत व्हीएनआयटी प्राध्यापकाने व्यक्त केले.

संरक्षण संशोधनाच्या क्षेत्रात व्हीएनआयटीकडून अनेक प्रकल्प राबविले जात आहेत. डीआरडीओकडून संदर्भित आर्टिलरी गन प्रकल्पावरही संस्था काम करत असून, साहित्य विकास, एम्बेडेड सिस्टिम्स आणि रासायनिक प्रक्रिया या क्षेत्रांतही संशोधन सुरू आहे. याशिवाय, व्हीएनआयटीमध्ये डीआरडीओची स्वतंत्र शाखा स्थापन होण्याचीही शक्यता संशोधकांनी व्यक्त केली आहे. असे झाल्यास संरक्षण संस्थांना शैक्षणिक सहकार्याची गरज असलेले प्रकल्प थेट व्हीएनआयटीकडे येतील.

# विद्यापीठात 'शैक्षणिक व आर्थिक शाश्वतता' विषयाची कार्यशाळा

## मा. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्याकडून आढावा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शैक्षणिक व आर्थिक शाश्वतता या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित ३ दिवसीय कार्यशाळेत कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी विद्यापीठातील संपूर्ण शैक्षणिक विभागांचा आढावा घेतला.

या कार्यशाळेत मा. कुलगुरु डॉ. मनाली मकरंद क्षीरसागर तिन्ही दिवस सर्व सत्रांना उपस्थित राहून विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय नेतृत्वाला सातत्याने मार्गदर्शन, नेतृत्व आणि धोरणात्मक दिशा दिली. कार्यशाळा १६ व १७ जानेवारी रोजी तसेच २१ जानेवारी



२०२६ रोजी पुढे चालू ठेवण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि नॅक गुणवत्ता निकषांशी सुसंगतपणे संस्थात्मक नियोजन बळकट करणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे आणि आर्थिक शाश्वतता सुनिश्चित करणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता.

विद्यापीठातील एकूण ४२ स्वायत्त शैक्षणिक विभागांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी त्यांच्या शैक्षणिक कृती आराखड्यांचे व आर्थिक शाश्वतता आराखड्यांचे सविस्तर सादरीकरण केले. तसेच, निरीक्षण निर्देशक व महत्त्वाचे कार्यप्रदर्शन निर्देशक स्पष्टपणे मांडण्यात आले. संबंधित चार विद्याशाखांच्या अधिष्ठाता यांनी धोरणात्मक भाषणे करून शैक्षणिक विस्तार, संशोधन बळकटीकरण आणि दीर्घकालीन संस्थात्मक विकासासाठी विद्याशाखानिहाय दिशादर्शक मार्गक्रमण सादर केले.

याशिवाय ज्ञान स्त्रोत केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, फ्वरअ मल्टीफॅसिलिटी सेंटर, प्रशिक्षण व रोजगार सेल आणि मानव संसाधन विकास केंद्र यांच्या संचालकांनी त्यांच्या संस्थात्मक प्रोफाइल्स, सुरू असलेल्या उपक्रम व भविष्यातील कार्य योजनांचे सादरीकरण केले.

सर्व सादरकर्त्यांना विद्यमान शैक्षणिक कार्यक्रमांची शाश्वतता सुनिश्चित करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे तसेच प्रदेशीय, राष्ट्रीय आणि जागतिक शैक्षणिक व औद्योगिक गरजांशी सुसंगत नवीन, गरजाधारित कार्यक्रम सुचविण्याचे निर्देश देण्यात आले. विद्यापीठाची आर्थिक स्वायत्तता आणि दीर्घकालीन शाश्वतता बळकट करण्यासाठी महसूलनिर्मितीच्या मार्गांचा शोध व विकास करण्याबाबतही विभागांना मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे समन्वयन आयक्यूएसी संचालक डॉ. नंदकिशोर एन. करडे यांनी केले. या कार्यशाळेत कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, अधिष्ठाता, वैधानिक अधिकारी, समिती सदस्य आणि विभाग प्रमुख यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यशाळेच्या शेवटी माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी समारोपात्मक भाषण करत चर्चांमधून निष्पन्न झालेल्या मुद्द्यांना कृतीयोग्य धोरणे व मोजता येण्याजोग्या परिणामांमध्ये रूपांतरित करण्याचे आवाहन केले.

# विद्यार्थ्यांनो..आदर्श नागरिक बनून समाजाचे ऋण फेडा : शैल जैमिनी




■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २३ :

समाज विद्यार्थ्यांना अप्रत्यक्षरीत्या घडवत असतो तेव्हा आपण उच्च विद्याविभूषित झाल्यानंतर सामाजिक ऋणानुबंध जोपासण्यासाठी आपल्या हातून समाजसेवा घडायला हवी. कुठल्याही क्षेत्रात यश संपादन केल्यानंतर सामाजिक ऋणानुबंध जोपासण्याची भावना आपल्या मनात असली पाहिजे तरच आपल्या समाजाची व देशाची प्रगती साधता येईल.

नागपूर आकाशवाणीच्या माध्यमातून हडस विद्यालयाच्या माजी शिक्षिका स्व. प्रभा साठे व माजी असोसिएट एनसीसी ऑफिसर स्व. सुहासिनी लाडकर यांनी विद्यार्थ्यांवर घडवलेले संस्कार आजही त्यांच्या जीवनात कायम उपयोगी पडत असल्याचे आकाशवाणी कलावंत शैल जैमिनी यांनी नमूद केले.

लिबरल एज्युकेशन सोसायटी, नागपूर द्वारा संचालित हडस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभप्रसंगी सुप्रसिद्ध लेखिका, नागपूर आकाशवाणी व दूरदर्शन कलावंत शैल जैमिनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमाला लिबरल एज्युकेशन सोसायटीचे सचिव निलेश साठे, कोषाध्यक्ष विनय लाडकर, प्राचार्य अजय लाबडे, पर्यवेक्षिका डॉ. प्रज्ञा देशपांडे, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ वैद्य, नरेंद्र राऊत प्रामुख्याने उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून सरस्वती स्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी टीईटी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग 9 ची विद्यार्थिनी अवंतिका बन्सोड हिने तर यशस्वी आयोजन नरेंद्र राऊत व सहकारी शिक्षकांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# वडंबा येथे कोया पुनेम सतरंगी ध्वजारोहण

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

गोंडवाना समग्र विकास क्रांती आंदोलन मिशनच्या वतीने रयतवारी सरकारी टोला, वडंबा येथे कोया पुनेम सतरंगी ध्वजाचा भव्य ध्वजारोहण कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी आचार्य मोती रावेण कंगाली यांच्या पुतळ्याचे विधिवत अनावरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने समाजबांधव, युवक, महिला शक्ती आणि आंदोलनाशी संबंधित पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी माजी जिल्हा परीषद सदस्य तथा गोंडवाना गणतंत्र पाटीर्चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तिरु. हरीश उईके, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनचे सरचिटणीस विजय कोकोडे, सेवानिवृत्त सहा. प्रकल्प अधिकारी हरिश्चंद्र सारियाम, सेवानिवृत्त सहसंचालक (लेखा) रमेश कुमरे, गोंडवाना गणतंत्र पार्टी रामटेक तालुका अध्यक्ष चिंतामण वरकडे, ज्ञानसिंह खंडाते, छिंदुलाल खंडाते, मायाराम कमरे, भूमक आसारामजी मंसाराम आदी मान्यवर उपस्थित होते. वक्त्यांनी कोया पुनेम दर्शन, गोंडवाना संस्कृती, निसर्ग संरक्षण, सामाजिक समरसता आणि स्वाभिमानावर आधारित विकासाच्या गरजेवर प्रकाश टाकला. गोंडवाना समग्र विकास क्रांती आंदोलन मिशनचे उद्दिष्ट शिक्षण, आरोग्य, रोजगार, संस्कृती आणि हक्कांचा समन्वित विकास जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हे असल्याचे त्यांनी सांगितले.




### आचार्य मोती रावेण कंगाली यांना अभिवादन

पुतळा अनावरणानंतर आचार्य मोती रावेण कंगाली यांच्या विचारांचे स्मरण करून वक्त्यांनी त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक योगदानाला वंदन केले आणि तरुणांना त्यांचे आदर्श अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी, गोंडवानाची अस्मिता, परंपरा आणि हक्कांच्या रक्षणासाठी संघटनात्मक मजबुतीसह शांततापूर्ण जनआंदोलन पुढे नेण्याचा सामूहिक संकल्प करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल कुमरे, युवराज वरठी, जितेंद्र ईनवाते, धनराज ईनवाते, पप्पू उईके, प्रवीण ईनवाते, जयराम खंडाते, अरुण भलावी, नामदेव माधवी, जितेंद्र मरकाम, अनिल वलके आणि इतर कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## जनरल इन्शुरन्स एम्प्लॉईज युनियनचे दोन दिवसीय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

जनरल इन्शुरन्स एम्प्लॉईज युनियन वेस्टर्न झोनचे ३० वे अधिवेशन हॉटेल तुली इंटरनॅशनल, सदर येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती जनरल इन्शुरन्स एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष प्रदीप धरमठोक यांनी पत्रपरिषदेत दिली. यावेळी महासचिव प्रशांत दीक्षित, विनायक कर्पे, सौरंभ तातेकर आदी उपस्थित होते.

इन्शुरन्स एम्प्लॉईज युनियनच्या दोन दिवसीय अधिवेशनाचे उद्घाटन प्रसंगी डॉ. श्रीनिवास खंदेवाले यांच्या हस्ते २४ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता होईल. अधिवेशनात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात, गोवा व छत्तीसगड या राज्यांतील सुमारे १५० प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील सर्वसाधारण विमा कंपन्यांना बळकटी देण्यासाठी उपाययोजना, तसेच चारही कंपन्यांचे विलीनीकरण, सार्वजनिक क्षेत्रातील विमा उद्योग व कर्मचाऱ्यांबाबत शासकीय धोरणे, सार्वजनिक क्षेत्रातील सर्वसाधारण विमा उद्योगाचे संरक्षण, कायमस्वरूपी भरतीची आवश्यकता, संघटनेच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी पुढील दिशा देण्यासाठी अधिवेशनात चर्चा केल्या जाणार आहे.

याशिवाय विमा क्षेत्रातील १०० टक्के थेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय), मागास कामगार संहितांची अंमलबजावणी, ऑगस्ट २०२२ पासून प्रलंबित वेतन पुनर्रचना, ३० टक्के कौटुंबिक तसेच राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (एनपीएस) अंतर्गत कंपनीचे १४ टक्के योगदान आदी विषयांवर अधिवेशनात चर्चा होणार आहे. तर दुसऱ्या दिवशी रविवार, २५ जानेवारीला पुढील कार्यकाळासाठी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येईल, तसेच महत्त्वाचे ठराव पारित करण्यात येणार असल्याची माहिती प्रशांत दीक्षित यांनी दिली.

# सफाई दूत यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २३ :

कामठी शहरातील प्रभाग क्रं. १४ येथे सफाई दूत कर्मचारी यांचा स्वागत व सत्कार सोहळा घेण्यात आला.

याप्रसंगी कामठी नगर परिषदचे नगर सेवक नितेश मुरारीलाल यादव माजी नगर सेवक विकास रंगारी, ज्येष्ठ सामाजीक कार्यकर्ते रामनाथ यादव, संदीप मेश्राम आदींनी निरंतर करण्याचे आदेश व कसल्याही प्रकारची अडचण आल्यास त्यांचे समाधान करण्याविषयी माहिती दिली.

या कार्यक्रमात सर्वश्री रामगोपाल गोयल (जमादार), भारत बाबूलाल महातो, सुनील हिरालाल मलिक, पद्मावती प्रकाश बरोन्दे, अजय लालु करिहार, हरीश सुरेश हाडोति, किरण राजु उसरे, रामेश्र्वरी शेखर बर्मन, मुन्नीबाई द्वारका प्रसाद महातो, आदी सफाई दूत मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांना जयंती निमित्त मनपा तर्फे विनम्र अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

तुम मुझे खून दो मै तुम्हे आजादी दुंगा भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची ज्वाला उत्पन्न करणारी घोषवाक्य देणारे भारत मातेचे वीर सुपुत्र महान स्वातंत्र्य सैनानी, थोर क्रांतीकारक, भारतरत्न, देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे शुक्रवारी (ता.२३) अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी मुख्य अभियंता मनोज तालेवार, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, उपायुक्त निर्भय जैन, उपायुक्तमंगेश खवले, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, सहाय्यक आयुक्त श्याम कापसे, कार्यकारी अभियंता श्रीकांत वाईकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, सर्वश्री प्रमोद हिवसे, जितेश धकाते आदींनीही पुष्पांजली अर्पण केली. तत्पूर्वी मनपातर्फे मानसचौक स्थित नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले.



## ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्टमध्ये विराट हेडाऊ प्रथम



■ महासागर प्रतिनिधी,नरखेड, दि. २३ :

ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्ट नरखेडमध्ये होणाऱ्या रेसो विस्टा परिक्षेत एकूण 90 विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. त्यात विराट हेडाऊ ला 92 टक्के मिळाले व त्याचा प्रथम क्रमांक आला आणि दर्शन मेटांगळेला 91 टक्के मिळाले व त्याचा द्वितीय क्रमांक आला. म्हणून ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्टच्या मुख्याध्यापिका भारती झाम्रे आणि मुख्याध्यापक अविनाश गजभिये यांनी विराट आणि दर्शनचे रेजो विस्टाचे प्रमाणपत्र देऊन अभिनंदन केले. रेसो विस्टाची परीक्षा दिनांक 21/09/2025 ला घेण्यात आली व त्या परीक्षेचा निकाल दिनांक 20/01/2026 ला लागला.

# संघर्षशील व्यक्तिमत्व क्रांतीजोती सावित्रीबाई फुले : दिलीप येवले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

क्रांतीजोती सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीच्यानिमित्ताने बॅरि. शेषराव वानखडे महाविद्यालय मोहपा, येथे महात्मा फुले आणि क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांच्या साहित्यावर निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते.

निबंध स्पर्धेचा पुरस्कार वितरणाचा सोहळा 22 जानेवारी गुरुवारला सामाजिक कार्यकर्ते दिलीप येवले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षशील जीवन प्रवासावर आपल्या ओझळत्या वाणीतून विद्यार्थ्यासमोर उभा केला आणि शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. हा आत्मविश्वास दिलीप येवले यांनी प्रमुख वक्ता म्हणून विद्यार्थीशी संवाद साधला. प्रथम पुरस्काराचा मानकरी बी.ए.भाग 1 चा विद्यार्थी, आदित्य पेंदाम तर द्वितीय पुरस्काराची मानकरी एम.ए.समाजशास्त्र, द्वितीय विषयाची विद्यार्थिनी कु. अर्चना नेहारे, यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अलका थोडगे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले प्रा.डॉ. प्रमोद वडते, डॉ. धनंजय देवते, डॉ. संजय ठवळे, प्रा. सचिन काळे, रजनी अकर्ते, प्रदीप बगडे, अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे, प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.विनोद भालेराव संचालन डॉ. लिलाधर खरपुरीये आभार प्रा. अनिता गणोरकर यांनी मानले.



# पात्र लाडक्या बहिणी केवायसीत रिजेक्ट

## फेर तपासणी व केवायसी करण्यात यावी : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २३ :

लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी महिला पात्र असूनही केवायसीमध्ये रिजेक्ट करण्यात आल्याने या संतप्त लाडक्या बहिणींनी पुन्हा फेरतपासणीची मागणी केली आहे. विशेष म्हणजे या महिलांच्या घरी कुणीही सरकारी नोकरीवर नसताना त्यांना सरकारी नोकरीमुळे केवायसी रिजेक्ट झाल्याचे मॅसेज आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

याबाबत डिगडोह नगर परिषद कार्यालयात जाऊन याबाबत नगराध्यक्षा पूजा उके यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या विरोधी पक्षनेत्या मनाली राजपूत,नगरसेवक सुरेश काळबांडे, खुमराज रहांगडाले, भारत मेश्राम, माजी उपसभापती उमेशसिंग राजपूत, संजय कोल्हे, कुँवरलाल रहांगडाले, गजानन पांडे यांच्या नेतृत्वात या महिलांनी निवेदन दिले. नगर परिषद क्षेत्रातील अनेक पात्र महिलांनी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नोंदणी केलेली आहे. महाराष्ट्र शासन तर्फे लाडकी बहीण योजना अंतर्गत लाभार्थी महिलांना प्रति महिना १५०० रु लाभ मिळत होता शासनाने काही दिवसा नंतर लाभाथार्ना केवायसी करणे बंधनकारक केले. त्या आधारे सर्व लाभाथीर्यांनी आधार कार्ड च्या माध्यमातून केवायसी केली.

केवायसी केल्यावर काही लाभात्यार्ना केवायसी रिजेक्ट असा मेसेज आला अश्या रिजेक्ट लाभार्थयांना आर्थिक लाभ बंद झाला. बंद झालेल्या लाभार्थी अतिशय गरीब असून त्यांना या प्रकारे अपात्र केल्याने त्या लाभापासून वंचित झाल्या आहेत.

सदर महिलांनी वेळोवेळी पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागलेला नसून त्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ही बाब सामाजिक व प्रशासकीय दृष्ट्या अत्यंत गंभीर आहे. तरी नगर परिषद प्रशासनाने सदर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन जिल्हा महिला व बालकल्याण विभागाशी अधिकृत पत्रव्यवहार करून रिजेक्ट झालेल्या लाभार्थी यांचे पुन्हा केवायसी प्रक्रिया करण्याबाबत आवश्यक निर्देश द्यावेत व पात्र लाभार्थी महिलांना योजनेचा लाभ त्वरित मिळेल यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.



## सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २३ :

नेताजी चौकातील एकमेव नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पूर्णाकृती पुतळ्याला नगराध्यक्ष अजय रुपनारायन अग्रवाल यांनी माल्यार्पण केले. यानंतर अग्रवाल यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आजादी करिता केलेल्या कार्याची माहिती सांगीतली.

तसेच इतर उपस्थित मान्यवरांनी नेताजीच्या जीवनावर प्रकाश टाकला.
याकार्यक्रमात सर्वश्री शहाजहा शफात अंसारी, मुख्याधिकारी विनोद जाधव, डॉ. मंगतानी, अजय अग्रवाल, लालसिंग यादव, मंगेश यादव, लाला खंडेलवाल, नीरज यादव, सोहेल असद, श्रावण केझरकर, नौशाद सिद्दिकी, प्रमोद वर्मन आशुतोष अवस्थी सहित नगर सेवक व गणमान्य नागरिक तसेच महेश चौबे, भानारकर, जैस्वाल, मलिक सह न.प. कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रातुम विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे उपकुलसचिव गणेश कुमकुमवार यांच्या शुभहस्ते नेताजी सुभाष चंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी अधीक्षक शैलेश राठोड यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

## एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालयात सरस्वती पूजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

23 जानेवारीला एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूर येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा वसंत पंचमीचा उत्सव साजरा करण्यात आला. ज्ञान, बुद्धी, कला, संगीत आणि वाणीची देवी सरस्वतीची महापूजा करण्यासाठी या दिवसाचे विशेष महत्त्व आहे.

व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष रणजीत देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत सरस्वती मातेची महापूजा करण्यात आली. याप्रसंगी एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ सजल मित्रा, संचालक (शैक्षणिक) डॉ. काजल मित्रा, उपअधिष्ठाता डॉ. विलास ठोंबरे, उपअधिष्ठाता व वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन देवस्थळे प्रामुख्याने उपस्थित होते.

महापूजा, होमहवन आणि आरती करून सरस्वती मातेची आराधना करण्यात आली. देवी सरस्वतीच्या आशीवार्दाने सर्वांना ज्ञान, शांती आणि समृद्धी लाभो, अशा शुभेच्छा रणजीत देशमुख यांनी उपस्थितांना दिल्या.

डॉ. मोहना मजुमदार, डॉ.अनिरुद्ध देवके, डॉ मनीष सवाने, डॉ. विवेक हरकरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनुज तिवारी, डॉ.राखी तिरपुडे, डॉ. ॲन विल्किन्सन, डॉ अंजली एडबर, डॉ.रेखा खंडेलवाल, डॉ. आशिष वैद्य, डॉ. राजेश डेहणकर, डॉ तृप्ती डोंगरे, डॉ. सुशील गावंडे, डॉ. देवांशी राठोड, डॉ. हिमांशू दांडेकर, सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी वृंद व विद्यार्थी यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. महाप्रसादाचे आयोजन यावेळी करण्यात आले होते.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ३० प्रकरणांची नोंद



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे.शुक्रवार(ता.23) शोध पथकाने 30 प्रकरणांची नोंद करून 17,100 रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400 दंड) या अंतर्गत 10 प्रकरणांची नोंद करून 4,000 रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 2 प्रकरणाची नोंद करून रू.200 रूपयाची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.400 दंड) या अंतर्गत 1 प्रकरणाची नोंद करून 400 रूपयांची वसुली करण्यात आली.

मॉल,उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डिंगचे हॉटेल, सिनेमाहॉल, मंगल कार्यालये,कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणाची नोंद करून रू. 2,000 रूपयाची वसुली करण्यात आली.वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 14 प्रकरणांची नोंद करून 8,500 रुपयांची वसुली करण्यात आली.

चिकन सेंटर,मटन विकेता यांनी रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणाची नोंद करून रू. 1,000 रूपयाची वसुली करण्यात आली.हॉटेल मध्ये डिसेलटिंग चेंबर नसणेचोक झाल्यावर घाण पसरवणे, कचरा शुल्क न भरणे व कचरा अन्य ठिकाणी फेकणे या अंतर्गत 1 प्रकरणाची नोंद करून 5,000 रूपयाची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 10 प्रकरणांची नोंद करून 2,000 दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत डॉ. जसवानी, मे. श्रीनिवास डेव्हलपर्स व मे. केदार डेव्हलपर्स यांनी रस्त्यालगत सी अँड डी कचरा टाकल्यामुळे प्रत्येकी रू.5,000या प्रमाणे रू.15,000 चे दंड वसुल करण्यात आले. हनुमाननगर झोन अंतर्गत मे. महात्मा फुले सभागृह यांनी शुल्क न भरल्यामुळे रू.5,000 दंड वसुल करण्यात आले.

धंतोली झोन अंतर्गत मे. उपाध्याय क्लिनीक यांनी साधारण कचऱ्यात बायोमेडिकल वेस्ट टाकल्यामुळे रू. 25,000 चे दंड वसुल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे. राधिका गिफट सेंटर यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू.5,000 दंड वसूल करण्यात आले.

सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. शेख बाबा फरीद स्वीटस यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू.5,000 दंड वसूल करण्यात आले. लकडगंज झोन अंतर्गत मे. बालाजी इंफ्रा यांनी रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्यामुळे रू. 10,000 चे दंड वसुल करण्यात आले. मंगळवारी झोन अंतर्गत मे. झाक रेस्टॉरेंट शुल्क न भरल्यामुळे रू.5,000 दंड वसुल करण्यात आले. उपद्रव शोध पथकाने 9 प्रकरणांची नोंद करून रू.70,000 दंड वसुल केला.

# आयसीएआय नागपूर शाखेतर्फे सीए सदस्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या वेस्टर्न इंडिया रीजनल कौन्सिलच्या नागपूर शाखेने शनिवार, १० जानेवारी २०२६ रोजी चार्टर्ड अकाउंटंट सदस्यांसाठी एका विशेष वक्तृत्व स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले. कार्यक्रमाची सुरुवात शाखा अध्यक्ष सीए दिनेश राठी यांच्या स्वागतपर भाषणाने झाली, ज्यांनी चार्टर्ड अकाउंटंटच्या व्यावसायिक कारकिर्दीला आकार देण्यासाठी वक्तृत्व आणि संवाद कौशल्यांच्या वाढत्या महत्त्वावर भर दिला. या कार्यक्रमाचे समन्वय सीए आशीष अग्रवाल यांनी केले. एकूण १४ सदस्यांनी सहभाग घेतला, ज्यांनी व्यावसायिक विकास आणि समकालीन विषयांवर विविध दृष्टिकोन मांडले. एक आकर्षक आणि स्पर्धात्मक फेरीनंतर, निकाल खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आलेः प्रथम पारितोषिक - सीए ऐश्वर्या रविकुमार, द्वितीय पारितोषिक - सीए अमन सिंघी, तृतीय पारितोषिक - सीए (डॉ.) सतीश गुप्ता. प्रथम विजेती आता स्पर्धेच्या प्रादेशिक स्तरावर पोहोचली आहे, जिथे तिला राष्ट्रीय अंतिम फेरीत नागपूरचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल. पहिल्या तीन विजेत्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली, तर सर्व सहभागींना कौतुक प्रमाणपत्रे देण्यात आली.

न्यायाधीशांच्या प्रतिष्ठित मंडळात सीए भरत शाह, डॉ. दीपशिखा मेहरा आणि मुकेश अशर यांचा समावेश होता, जे शिक्षण, प्रशिक्षण आणि सामुदायिक नेतृत्व या त्यांच्या संबंधित क्षेत्रांमध्ये प्रतिष्ठित आहेत.

कार्यक्रमाचा समारोप शाखा सचिव सीए दीपक जेठवानी यांनी आभार प्रदर्शनाने केला, ज्यांनी सहभागींच्या उत्साहाची दखल घेतली आणि सदस्य व स्वयंसेवकांच्या समर्थनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# स्मृतीगंध कार्यक्रमात कथा वाघांची पुस्तकाचे प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

वनविभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या आयोजित स्मृतीगंध या कार्यक्रमात संजय करकरे लिखित कथा वाघांची या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सेमिनरी हिल्स परिसरातील वन विभागाच्या हरिसिंग सभागृहात पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी मुख्य वनसंरक्षक लक्ष्मी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थितीत होत्या. याप्रसंगी निवृत्त वनसंरक्षक रवींद्र वानखडे, निवृत्त प्रधान मुख्य संरक्षक प्रकाश ठोसरे, वनाधिकारी उत्तम सावंत, पद्मनाभ तसेच वन अधिकारी एन. आर. राऊत यांची उपस्थिती होती.



याप्रसंगी लेखक संजय करकरे यांनी व्याघ्र संवर्धनाची चळवळ या विषयावर सादरीकरण करत भारतातील वाघ संवर्धन तसेच जंगल संरक्षणाच्या प्रवासाचा सविस्तर आढावा मांडला. कार्यक्रमाला वनविभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच निसर्गप्रेमी मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कथा वाघांची या पुस्तकात संजय करकरे यांनी विविध जंगलांमधील ४५ प्रसिद्ध वाघांच्या रोचक, प्रेरणादायी आणि वास्तव घटनांवर आधारित लेखन केले आहेत. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ ते विदर्भ तसेच मध्य प्रदेशातील जंगल परिसरातील गावांमध्ये पर्यावरण शिक्षण जनजागृतीचे कार्य करत आहेत.

# डॉ. निलेश चव्हाण यांचा शिक्षकरत्न पुरस्काराने गौरव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

आनंदराव गायकवाड बहुउद्देशीय संस्था, नागपूर अंतर्गत सामाजिक बांधिलकी फाउंडेशन, नागपूर यांच्या वतीने दिला जाणारा ज्योतीबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार यशोदाबाई खरे अध्यापक विद्यालय, नागपूर येथील प्राचार्य डॉ. निलेश चव्हाण यांना जाहीर झाला आहे.

शैक्षणिक क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य, गुणवत्तापूर्ण शिक्षक घडविण्यासाठी दिलेले योगदान तसेच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांतील सक्रिय सहभाग याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण प्रसंगी डॉ. निलेश चव्हाण यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.या पुरस्कारामुळे शिक्षण क्षेत्रात कार्यरत शिक्षकांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.




# लाव्ह्यात श्री रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

लाव्हा येथील संतोषी माता नगर परिसरातील श्री पंचमुखी धाम मंदिरात श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र, अयोध्या येथील श्री रामलल्ला प्राणप्रतिष्ठेच्या द्वितीय वार्षिक महोत्सव निमित्ताने श्री रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळा गुरुवार २३ जानेवारी रोजी उत्साहात पार पडला. यावेळी श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम श्री रामलल्लाची पुजा आमदार समीर मेघे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी सरपंच ज्योत्सना नितनवरे, नगराध्यक्ष नरेश चरडे, उपनगराध्यक्ष कल्पना सगदेव रामनिवास अग्रवाल मानसिंह ठाकुर, राजमणि पांडे, धर्मेंद्र सिंह अविनाश तिवारी, तारकेश्वर सिंह, धर्मेंद्र पांडे वीरेंद्र मिश्रा, जयदेव, कैलाश शर्मा, भोयर, शहाकार, राऊत, ठाकरे, सुजित नितनवरे, आनंदबाबु कदम, कैलाश मंथापूरवार, हर्षल काकडे, केशव बांदरे, राजेश जयस्वाल, पुरुषोत्तम रागीट, दिनेश कोचे, विजय मेंढे, संदीप चरडे, कमल कनोजे, संतोष केचे, दामोधर जोध, दिवानजी रहांगडाले, दिनेश उईके, राजुताई भोले, नगरसेविका सरीता यादव, ज्योती भोरकर, पूर्वा काकडे, मनोरमा येवले, रेखा रोडे,संगीता बावणे, कांचन उईके, लीलाबाई रहांगडाले, किरण लांजेवार, सविता ईसळ, दिव्या तिरपुडे आदीसह हजारो नागरीक उपस्थित होते.

# बेला वर्धा मुक्कामी बस सुरू

■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. २३ :

गेल्या करोना काळापासून बंद असलेली वर्धा येथून बरबडीपर्यंत येणारी बससेवा बेला येथे मुक्कामी सुरू करण्यात आली आहे. वर्धा बस स्थानकावरून सायंकाळी ६.३० ला सुटणारी ही बस रात्री बेळ्यात मुक्कामी असते तर दुसऱ्या दिवशी बेला बसस्टॅन्डवरून सकाळी ६ वाजता सुटते. सकाळी जाणाऱ्या परिसरातील असंख्य प्रवाशांनी सुखेचा स्वास सोडला. याची नोंद घ्यावी. असे आवाहन परिवहन महामंडळाने केले आहे.

बेला येथून वर्धेला सकाळी जाणारी थेट बस सेवा नव्हती. त्यामुळे प्रवाशी लांब अंतराच्या बुटीबोरी मार्गाने फेऱ्याने जात होते. ते खूप त्रासदायक होते शिवाय वेळ व पैसा वाया जात होता. सुरू झालेली मुक्कामी बस 7 वर्षांपूर्वी बेला येथून सुरू होती. ती बंद करून ' वर्धा - बरबडी ' अशी केली होती. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते उत्तम पराते यांनी बेला भागातील प्रवाशांची गैरसोय प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गभणे व विभाग नियंत्रक तांबे यांना निवेदन देऊन कळविले असता,त्यांनी वर्धा येथील सहाय्यक विभाग नियंत्रक बोडखे यांना बस सेवा सुरू करण्याचे निर्देश दिले. तपासणी व निरीक्षणाअंती ही बस सेवा २१ जानेवारी पासून वर्धा आगाराने सुरू केली. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला. या बस फेरीचा प्रवाशांनी लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन महामंडळाने केले आहे.

**सकाळी ९ वा.बसफेरीची गरज**

सध्या बेला येथून सुरू असणारी सकाळी १० ३० वा.ची बसफेरी दुपारी १२.३० ला वर्धा येथे पोहोचते. त्यामध्ये महाविद्यालयीन मुलांचे दीड तासाचे शैक्षणिक नुकसान होते. त्यामुळे बेला येथून सकाळी ९ वा. हमदापुर मार्गे वर्धा बसफेरी तातडीने सुरू करण्यात यावी, अशी विद्यार्थी व प्रवाशांची आग्रही मागणी आहे.

सुरू झालेल्या वर्धा बेला मुक्कामी बसच्या चालक, वाहकांचे झोपण्याची निवास व्यवस्था बेला ग्रामपंचायतने ग्रामसचिवालयात केली. याबाबत, निरीक्षण व तपासणी प्रसंगी सरपंच अरुण बालपांडे, उपसरपंच प्रशांत लांबट व ग्राम विकास अधिकारी साहेबराव शंभरकर यांनी सहमती दिल्यामुळे निवासाची समस्या सुटली. प्रवासी व परिवहन मंडळाचे वर्धा आगाराने त्यांचे आभार मानले.

# पोरवाल महाविद्यालयात वसंत पंचमी व नेताजी जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

कामठी येथील सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात वसंत पंचमी आणि सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. सुधीर अग्रवाल होते. यावेळी मंचावर पर्यवेक्षक प्रा. विश्वनाथ वंजारी आणि डॉ. नीता वानखेडे उपस्थित होते.

प्रमुख अतिथी म्हणून प्रा. जाधवानी उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच, डॉ. सुधीर अग्रवाल यांनी आपल्या भाषणात माता सरस्वती, संत तुकाराम, सुभाषचंद्र बोस आणि हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीसंदर्भात माहिती दिली. त्यांनी सांगितले की, वसंत पंचमी ही शिशिर ऋतूमध्ये येणारी माघ शुद्ध पंचमी असून, वसंत पंचमीला श्रीपंचमी किंवा ज्ञानपंचमी असेही म्हणतात. वसंत ऋतूला ऋतूंचा राजा मानले जाते आणि त्याचे स्वागत करण्याचा हा विशेष दिवस आहे.

# आपले सरकार पोर्टल व माहितीचा अधिकार कायद्याची जि.प.कडून पायमल्ली

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

**चुकीची माहिती देऊन नागरिकांची फसवणूक**

राज्य शासनाच्या आपले सरकार पोर्टल तसेच माहितीचा अधिकार कायदा २००५ यांची नागपूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून खुलेआम पायमल्ली होत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक सेनेने केला आहे. चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन नागरिकांची फसवणूक केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभागामध्ये सन २०१० ते २०२५ या कालावधीत शिक्षण विस्तार अधिकारी वर्ग-३ (श्रेणी दोन व श्रेणी तीन) पदावर झालेल्या पदोन्नतीबाबतची सविस्तर माहिती माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत मागविण्यात आली होती. यामध्ये मंजूर पदे, रिक्त पदे, भरलेली पदे, सेवाज्येष्ठता यादी, कार्यालयीन टिपण्या, शासन निर्णय व जिल्हा पदोन्नती समितीचे इतिवृत्त आदी माहितीचा समावेश होता.

मात्र विहित मुदतीत माहिती न दिल्याने प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्याकडे अपील दाखल करण्यात आले. सदर अपीलवर १० दिवसांत निःशुल्क माहिती देण्याचा आदेश होऊनही, संबंधित लिपिक तथा सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याचा आरोप आहे.

तसेच राज्यात एकमेव नागपूर जिल्हा परिषदेत गेल्या १० वर्षांपासून कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी (श्रेणी तीन) या पदावरील पदोन्नती गोठवून सदर पदे नियमबाह्यरीत्या शिक्षण विस्तार अधिकारी (श्रेणी दोन) मध्ये परावर्तित (मर्ज) करण्यात आल्याने शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार आपले सरकार पोर्टलवर मनसे शिक्षक सेनेचे राज्य सरचिटणीस शरद भांडारकर यांनी केली होती.

या तक्रारीत पदोन्नतीस पात्र असलेल्या डी.एड. प्राथमिक शिक्षकांना डावलून, मंजूर पदे नसतानाही बी.एड. पदवीधर प्राथमिक शिक्षकांना श्रेणी दोनमध्ये पदोन्नती देण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, त्यासंबंधीचा शासन निर्णय किंवा परिपत्रक सादर करण्याची मागणी करण्यात आली होती.

मात्र या तक्रारीच्या उत्तरादाखल जिल्हा परिषद शिक्षण विभागाने बदलीने कार्यमुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी असलेली पीडीएफ जोडून चुकीची व खोटी माहिती सादर केल्याचा आरोप मनसे शिक्षक सेनेने केला आहे. शासनाच्या स्वच्छ व पारदर्शक प्रशासनाच्या दाव्याला जिल्हा परिषद शिक्षण विभागाने हरताळ फासल्याचा आरोप करत, खोटी माहिती देऊन नागरिकांची फसवणूक करणाऱ्या व माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक-शिक्षकेत्तर सेनेचे राज्य सरचिटणीस शरद भांडारकर व महेश जोशी यांनी केली आहे.

# स्मृती लेआऊटमध्ये राम मंदिर प्राणप्रतिष्ठा द्वितीय वर्षगाठ साजरी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

स्मृती लेआऊट येथील सरकारी गार्डनमध्ये राम मंदिर प्राणप्रतिष्ठेच्या द्वितीय वर्षगाठीनिमित्त स्मृती लेआऊट सुधार समिती महिला मंडळाच्या वतीने भक्तिमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यानंतर भक्तीभावाने आरती करण्यात येऊन कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी नगरसेविका मनोरमा येवले यांच्या हस्ते प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करण्यात आले. तसेच नगरसेविका लीलाबाई रहांगडाले यांनीही प्रतिमेचे पूजन केले.

या कार्यक्रमास स्मृती लेआऊट सुधार समिती महिला मंडळाच्या अध्यक्षा शिल्पा भिसे, उपाध्यक्षा सविता निखाडे , अरुणा पेटकुले, अंजली शरणागत, राणी गावंडे, सरिता राऊत, स्कोलते, योगिता वाघमोडे, मंजुषा तलमले, कडू, प्रमिला मडावी, सौ.सिडाम, कुलकर्णी तसेच इतर महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# संताजी तेली समाजाचा वधू-वर व पालक परिचय मेळावा

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २३ :

संताजी तेली समाज एक फाऊंडेशन, वर्धा (नोंदणी क्रमांक महा/४१/२१) यांच्या वतीने रविवार, २५ जानेवारी रोजी वधू-वर व पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा संताजी सेवा व सांस्कृतिक मंडळ सभागृह, कृष्णनगर, बॅचलर रोड, शास्त्री चौक जवळ, वर्धा येथे संपन्न होणार आहे. समाजातील विवाहयोग्य युवक-युवती तसेच त्यांचे पालक यांनी या मेळाव्यात आवर्जून उपस्थित राहून आपला परिचय करून द्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. त्यामुळे या उपक्रमासाठी समाजबांधवांचे सहकार्य, व योगदान अपेक्षित असल्याचेही नमूद करण्यात आले. सदर समाजकार्याकरिता नागपूर विभागातील समन्वयक राजेश थोराने, शैलेश थोराने, वसंतराव ईखनकर, नानाभाऊ पारधी, पुरुषोत्तम लिचडे, प्रकाश बिडवाईक, कैलास अडले, नितेश क्षीरसागर, अतुल खाडे, नामदेव चौरे, अनिल पुंड, नरेशजी ठुठूरकर, दयाराम शिंदुरकर, अरुण डोईफोडे, सुरेश थोराने, शंकर थोराने व धनराज नाकाडे यांनी समाजबांधवांना सहभागाचे आवाहन केले आहे.

# पुसला-मोवाड विभागात आरओबी गर्डर यशस्वीपणे लॉन्च

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने सेतुबांधन योजनेअंतर्गत पुसला-मोवाड स्थानकांदरम्यान असलेल्या लेव्हल क्रॉसिंग क्र. 57 च्या बदल्यात बांधण्यात येत असलेल्या रोड ओव्हर ब्रिज (आरओबी) अंतर्गत गर्डर लॉन्चिंगचे महत्त्वपूर्ण टप्पे यशस्वीपणे पूर्ण केले आहेत.

लेव्हल क्रॉसिंग क्र. 57 हे इंजिनीअरिंग नॉन-इंटरलॉक गेट आहे. आरओबीच्या उभारणीमुळे रस्ता-रेल्वे संघर्ष टळणार असून परिसरातील वाहतूक सुरक्षितता व संपर्कामध्ये मोठी सुधारणा होणार आहे. प्रस्तावित आरओबीमध्ये 10.50 मीटर रुंद कॅरेजवे तसेच एका बाजूस 1.5 मीटर रुंद पदपथाची तरतूद आहे. रेल्वे हद्दीतील एकूण लांबी 180 मीटर आहे. रेल्वे भागामध्ये प्रत्येकी 30 मीटरचे चार स्पॅन असलेले संयुक्त स्टील गर्डर बसविण्यात येत असून स्क्यू अँगल 24 अंश आहे.



स्टील गर्डरचे लॉन्चिंग 19, 20 व 21 जानेवारी 2026 रोजी तीन नियोजित ट्रॅफिक ब्लॉक्सदरम्यान यशस्वीपणे पार पडले. एकूण सहा गर्डर लॉन्च करण्यात आले.

या कार्यात अभियांत्रिकी, ऑपरेटिंग व सेफ्टी विभागांमध्ये उत्तम समन्वय राखण्यात आला असून कोणतीही अनुचित घटना न घडता काम सुरळीतरीत्या पूर्ण झाले. ही कामगिरी मध्य रेल्वेच्या पायाभूत सुविधा विकास, सुरक्षितता वृद्धिंगत करणे व रस्ता-रेल्वे एकात्मतेप्रती असलेली बांधिलकी दर्शविते. आरओबी पूर्ण झाल्यानंतर निर्बाध रस्ते संपर्क, वाहतूक कोंडीत घट व रेल्वे तसेच रस्ते वापरकर्त्यांसाठी अधिक सुरक्षित प्रवास सुनिश्चित होईल.

# निशिकांत मायी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

आपल्या सभोवताल पर्यावरण आणि पक्षांबद्दल अतिशय आस्था असणारे आणि अजिबात ज्ञान नसणारे असे दोन समाज पहावयास मिळतात. अशी पाखरे येती हा ग्रंथ पक्षांविषयी रोचक माहिती देतानाच या दोन्ही समाजातील दरी कमी करणारा आहे. पक्षाच्या जीवसृष्टीतील स्थानाविषयी लोकजागृती करणारे हे पुस्तक पर्यावरणयोद्धे तयार करणारेही ठरणार असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पक्षी अभ्यासक अनिल पिंपळापुरे यांनी केले.




तरुण भारतमध्ये कार्यरत ज्येष्ठ पत्रकार निशिकांत मायी लिखित अशी पाखरे येती या पुस्तकाच्या प्रमुख अतिथी म्हणून ते प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. तुटत चाललेला मानव आणि पक्षांचा सहसंबंध अधिक धृढ करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. 101 पक्षांचे जग अभ्यासू व रोचक पद्धतीने उगलडणारे हे पुस्तक श्री नरकेसरी प्रकाशनद्वारे प्रकाशित करण्यात आले आहे. रामदासपेठेतील संस्कृती सेलिब्रेशनमध्ये आयोजित या प्रकाशन सोहळ्याला अध्यक्षस्थानी इको बॅलन्स ऊंडेशनचे संचालक नितीन मराठे होते. ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. चारूदत्त मायी आणि लेखक निशिकांत मायी व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. चारुदत्त मायी यांनी मनोगतात पक्षांचे पर्यावरण आणि शेतीसाठीचे महत्व कळण्यासाठी हा ग्रंथ महत्वाचा ठरणार असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात नितीन मराठे म्हणाले पक्षांबाबत अनेक भ्रामक कल्पना समाजात आहे. वनविभागाकडेही जंगलातील पक्षांची संपूर्ण माहिती नसल्याचे वास्तव आहे.

आम्ही स्वतः पक्षांची यादी तयार करून वनविभाला दिल्याचे ते यावेळी म्हणाले. शहरीकरणामुळे पक्षांच्या जीवनावर होत असलेला परिणाम लक्षात घेत यावर उपाय शोधण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. प्रास्ताविकपर मनोगतातून निशिकांत मायी यांनी पुस्तकाचा हेतू स्पष्ट केला. संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

याप्रसंगी तरुण भारतचे प्रबंध संचालक धनंजय बापट, मुख्य संपादक शैलेश पांडे, नागपूर विभागाचे माहिती आयुक्त गजाजन निमदेव, ज्येष्ठ पत्रकार कमलाकर धारप यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. मायी परिवाराच्या वतीने मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# वसंत पंचमी ते रथसप्तमी पर्यंत श्रीक्षेत्र अंबाळा येथे कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

श्रीक्षेत्र अंबाळा येथील श्रीसूर्य मंदिर परिसरात दरवर्षी प्रमाणे वसंत पंचमी ते रथसप्तमी,दि.२३ ते २५ जानेवारी असे तीन दिवस श्री लक्ष्मीनारायण तथा श्री सूर्यनारायण महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

भगवान श्री सूर्यनारायण तेजाचे प्रतिक असून आपले जीवन तेजोमय करण्यासाठी श्री सूर्यनारायण देवतेची पूजाअर्चना केली जाते. श्री सूर्यनारायणाचा वषार्तील श्रेष्ठ व महत्वाचा दिवस म्हणजे 'रथसप्तमी' होय. या दिवशी श्री सूर्यनारायणाची उपासना केल्यास जीवनातील सर्व अरिष्ट्ये दूर होतात अशी मान्यता आहे. रथसप्तमी हा दिवस रविवारी आल्याने हा दुग्धशर्करा योगच समजला जात आहे. यामुळे वसंतपंचमी ते रथसप्तमीपर्यंत तीन दिवसीय महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ ते रविवार २५ जानेवारी २०२६ पर्यंत दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत तीन दिवस महायज्ञ व महापुजा संपन्न होणार असून दि.२५ जानेवारी ला रविवारी रथसप्तमीला दुपारी १ वाजता पूणार्हुती व दुपारी २ वाजता आरती होईल.

त्यानंतर महाप्रसाद वितरण केले जाईल. या धार्मिक कार्यक्रमात भाविक भक्तांनी सहपरिवार सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक माजी नगरसेवक तथा भाजप चे जिल्हा महामंत्री संजय मुलमुले, अखिल भारतीय व्यापारी संघटना (कॅट), नागपूरचे अध्यक्ष बि.सी. भरतिया व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती सुनील मुलमुले,मनसेचे माजी तालुका अध्यक्ष अनिल मुलमुले यांनी केले आहे.

# रामटेकमध्ये तीन दिवस रंगणार सांस्कृतिक महोत्सव



## सुदेश भोसले, साधना सरगम, कुमार विश्वास, सोनू निगम लावणार हजेरी

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित रामटेक सांस्कृतिक महोत्सव २०२६ रामटेकच्या नेहरू मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी या दरम्यान होणाऱ्या या महोत्सवात विविध कलाविष्कार सादर केला जाणार आहे. ३० जानेवारी २०२६ ला सुदेश भोसले, ३१ जानेवारीला कुमार विश्वास, व १ फेब्रुवारीला सोनु निगम यांच्या संगीतमय कार्यक्रम होणार आहे. यापूर्वी जनतेचा सहभाग वाढावा यासाठी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. २८ जानेवारी पासून क्रीडा स्पधेर्चे आयोजन करण्यात आले आहे.

यात बुध्दीबळ, कबड्डी, बॅडमिंटन, स्केटिंग, नौकानयन, हॉलीबाल, मेहेंदी, रांगोळी, कुस्ती, मॅराथॉन अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. यावेळी बक्षीसांची लयलुट होणार आहे. रामटेक सांस्कृतिक महोत्सवात होणारी गर्दी लक्षात घेता पार्किंगची व्यवस्था ठिक ठिकाणी केली आहे. महिला बचत गटांना आर्थिक मदत व्हावी यासाठी खाद्य पदार्थाचे स्टॉल लावले जाणार आहे. रामटेक सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजीत पवार, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती आज पत्रकार परिषदेत कार्यक्रमाचे आयोजक राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिली.

यावेळी तहसीलदार रमेश कोळपे, मुख्याधिकारी पल्लवी राऊत, गटविकास अधिकारी जयसिंग जाधव, नगरपरीषदचे उपाध्यक्ष आलोक मानकर, ऋषीकेश किंमतकर सह आदी उपस्थित होते. रामटेकचे नाव भारतात प्रसिद्ध होवुन विविध प्रकारचे उपक्रम राबविले जावे व रामटेकचा सांस्कृतिक विकास व्हावा यासाठी जनतेने यात सहभाग घेऊन हा महोत्सव यशस्वी करावा असे आवाहन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी केले .

# तहसीलदार व नायब तहसीलदार यांना निलंबीत करा

## पत्रपरिषदेत स्वप्नील मालके यांनी केली मागणी



* मांगरुड येथील स्ट्रोन क्रेशर मालक अवैध उत्खनन करीत असल्याचा आरोप
* महसुलमंत्री यांच्याकडे नागपूर जनता दरबारात तक्रार

■ राजेश जांभुळे,
भिवापूर, दि. २३ :

भिवापूर पासून २५ किमी अंतरावर मांगरुड हे गाव आहे. येथे बऱ्याच स्ट्रोन क्रशर आहे. यातील मो. साजिद शफीक अन्सारी, जावेद शफीक अहमह यांच्या मालकीची के जि एन स्ट्रोन क्रशर कंपनी आहे. यामध्ये रात्र दिवस उत्खननाचे काम सुरू असते. या क्रशर मालकांनी पहन ४४ मधील गट नं. ३६६ मधील २.४४ हे. आर जमीन पैकी परवानगी पेक्षा जास्तीचे उत्खनन करून यातून २००० ब्रास दगड, मुरूम, बोल्डर उत्खनन करून त्याची वाहतूक केली असून शासनाच्या लाखोंच्या महसूलची चोरी केल्याची माहीती मांगरुड येथील स्वप्नील मालके यांनी शासकीय विश्रामगृह येथे आज दिनांक. २३ ला जानेवारीला आयोजित पत्रपरिषदेत दिली.

तसेच ही जागा राज्य मार्गापासून ३०० मिटरच्या अंतरावर आहे. तसेच लगतच आदिवसी आश्रमशाळा आहे. स्ट्रोन क्रशरच्या ठिकाणी नेहमी बोअर ब्लास्टिंग होत असते. व नेहमी धुळ उडत असतो त्यामुळे विद्यार्थ्यांचे सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे खप्नील मालके यांनी यावेळी स्पष्ट करून. त्यांनी पुर्व व दक्षिण वनविभागाच्या राखीव जमिनीवर उत्खनन हे स्ट्रोन क्रशर मालक करीत असल्याचा आरोप यावेळी त्यांनी केला.

याबाबत सुरवातीला उपविभागीय अधिकारी चव्हाण, उमरेड यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली. नंतर २० जानेवारीला पालकमंत्री तथा महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचेकडे जनता दरबार, नागपूर येथे लेखी तक्रार देण्यात आली होती.

याबाबत पालकमंत्री बावनकुळे यांनी विषयाचे गार्भीय लक्षात घेता उपविभागिय अधिकरी चव्हाण यांना लिखीत आदेश देत योग्य कारवाई करण्याचे सांगितले होते. परंतू याबाबत कारवाई मात्र करण्यात न आल्याचे स्ट्रोन क्रशर मालक व अधिकारी यांची मिलीभगत असल्याचा गंभीर आरोप करून त्यांनी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना त्वरीत निलंबीत करण्याची मागणी यावेळी पत्रपरिषदेत केली. याप्रसंगी शेतकरी सुधीर नथ्थुजी गाडेकर, पंकज विठ्ठल पिल्लेवान उपस्थित होते.

# गतीमंद मुलीवर मातृत्व लादणाऱ्यास जन्मठेप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिच्यावर मातृत्व लादल्याचा गुन्हा सिद्ध झाल्याने अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जहीर अब्बास शेख यांनी दिलीप शेंडे या नराधमाला जन्मठेप सुनावली. पीडित अल्पवयीन मुलगी ही जलालखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहते. ती गतीमंद आहे. मुलगी गतीमंद असल्याचा गैराफायदा घेत आरोपी दिलीपने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यातून ती गर्भवती झाली. एके दिवशी मुलगी ही तिच्या काकूसोबत शेतात कामाला गेली होती. अचानक मुलीला चक्कर येऊन ती खाली पडली.

तिला दवाखान्यात नेले असता ती सात महिन्याची गर्भवती असल्याचे लक्षात आले. तिची विचारपूस केली असता तिने दिलीपचे नाव घेतले. त्यावरून जलालखेडा पोलिसांनी बलात्कार आणि अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवून दिलीपला अटक केली. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करून आरोपीविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. दरम्यान, मुलीच्या पोटातच तिच्या बाळाचा मृत्यू झाला होता. सरकारच्या वतीने मुलगी, तिचे बाळ आणि दिलीप यांची डीएनए तपासणी केली. याप्रकरणात 18 साक्षीदार तपासण्यात आले. न्यायाधीश जहीर अब्बास शेख यांनी डीएनए चाचणीचा अहवाल आणि साक्षीदारांची साक्ष लक्षात घेता आरोपी दिलीप यास जन्मठेप सुनावली.

# ताजबाग येथे बाबा ताजुद्दीन यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

२७ जानेवारी २०२६ रोजी बडा ताजबाग दर्गा संकुलात सूफी संत हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन (रहमतुल्लाह अलैह) यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तीने साजरी केली जाईल. या निमित्ताने हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टने ताजबाग संकुलात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. शुक्रवारी, विश्वस्तांनी जयंतीच्या तयारीचा आढावा घेतला आणि संकुलातील व्यवस्थेची पाहणी केली. या प्रसंगी हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकर, विश्वस्त हाजी फारूखभाई बावला, मुस्तफाभाई टोपीवाला, गजेंद्रपाल सिंह लोहिया आणि हाजी इम्रान खान ताजी उपस्थित होते.

ट्रस्टच्या म्हणण्यानुसार, सकाळी १० वाजता ताजबाग ट्रस्ट कार्यालयातून संदल मिरवणूक काढली जाईल, जी शहरातील विविध भागात गस्त घालेल आणि नंतर ताजबागमध्ये परत येईल.

बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांचा वाढदिवस केक कापून साजरा केला जाईल. त्यानंतर संध्याकाळी मगरिबच्या नमाजानंतर कुराण खानी आणि मिलाद आयोजित केली जाईल, ज्यामध्ये मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे. ट्रस्टने ताजबाग येथे भाविकांसाठी लंगरची विशेष व्यवस्था देखील केली आहे.

या प्रसंगी ताजबाग येथे कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येईल. कोणताही गोंधळ होऊ नये म्हणून पोलिसांच्या देखरेखीसह, संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसवण्यात आले आहेत. बाबांच्या जयंतीनिमित्त देशात शांती, बंधुता आणि सौहार्द नांदण्यासाठी विशेष प्रार्थना केली जाईल.

बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांचे आशीर्वाद घेण्यासाठी ट्रस्टने सर्व भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

**प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण**

हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी ट्रस्ट कार्यालय परिसरात ध्वजारोहण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान यांच्या हस्ते राष्ट्रध्वज, तिरंगा फडकवण्यात येईल. सर्व विश्वस्त, कर्मचारी, सेवक, विद्यार्थी आणि भक्त उपस्थित राहतील.

# ला.भु.विद्यालय कोंढाळी येथील वार्षिक स्नेहसंमेलनातून विदयार्थ्यांचा कला अविष्कार

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २३ :



सि. पी. अँड बेरार एज्युकेशन सोसायटी, कोंढाळी द्वारा संचालित लाखोटीया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, लोणकरण राठी प्राथमिक शाळा तसेच लाखोटीया भुतडा (सी.बी.एस.ई.) स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक स्नेहसम्मेलनात विदयार्थ्यांचा विविध कार्यक्रमातून सादर केलेला कला आविष्कार लक्ष्यवेधी ठरला. शालांत व उच्च शालांत परीक्षा उत्कृष्ट निकाल, क्रीडा, विज्ञान व संस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांना पारीतोषिके याप्रसंगी वितरित करण्यात आली.

रंगारंग कार्यक्रम सोहळ्याचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते पार पडले.कार्यक्रमात व्यवस्थापक मंडळाच्या अध्यक्षा रेखाताई सुभाषजी राठी अध्यक्ष स्थानी होते. प्रमुख उपस्थिती व प्रेरणास्थान सचिव डॉ. शामसुंदरजी लद्धड,संचालक राहुल लद्धड,सुनील लद्धड, आनंद राठी आदी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी न.पं नवनिर्वाचित उपाध्यक्ष हेमलता पालीवाल, याचवर्षी सेवानिवृत्त माजी प्राचार्य सुधीर बुटे व वरिष्ठ शिक्षक शिवाजीराव जामदार यांचा स्वपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात सीबीएससीचे प्राचार्य केदार पवार व लोणकरण राठी प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका सविता देशमुख, नगरीतील प्रतिष्ठित मंडळी पत्रकार प्रामुख्याने उपस्थित होते. अतिथी माजी मंत्री रमेशचंद्र बंग यांनी आजच्या विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अतिरेकी वापरापासून दूर राहावे. अशी चिंता व्यक्त केली. मोबाईलचा वापर केवळ अत्यावश्यक कामासाठीच करावा. संस्थेनी शिक्षण, कला, क्रीडा, विज्ञान व संस्कृती या क्षेत्रात मेहनत घेतल्याचे फळ आपणास मिळत आहे. आपण अशीच यशाची पायरी चढत रहा.यातूच उज्ज्वल भविष्य घडू शकते.

ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेवर बोलताना त्यांनी इयत्ता ११ वीचे प्रवेश ग्रामीण भागातच सुरक्षित ठेवावेत, अशी ठाम मागणी केली. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा फटका ग्रामीण व स्थानिक विद्यार्थ्यांना बसत असल्याने अनेक उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रवेश क्षमतेवर गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या वेळी विज्ञान, चित्रकला व रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. एन.सी.सी., स्काऊट व गाईड यांच्या नेत्रदीपक पथसंचलनाने उपस्थितांचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या समूहगाण, नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रमांनी कार्यक्रमात रंगत आणली. शाळेचा निकाल अधिक उत्कृष्ट ठेवण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असा सल्ला माजी मंत्री रमेशचंद्र बंग यांनी दिला. विद्यालयाच्या प्रगतीचा अहवाल प्राचार्य कैलास थुल यांनी सादर केला. कार्यक्रमाच्या शेवटी उद्घाटक डॉ रविंद्र शोभने यांनी जीवनात यश मिळवण्यासाठी चिकाटी, जिद्द व सातत्य अत्यावश्यक आहे व विद्यार्थ्यांनी टॉलस्टॉय सारख्या साहित्यिकांचे पुस्तक वाचन करणे अत्यावश्यक आहे. वाचन संस्कृती जोपासली तर समृद्ध समाज निर्माण होतो.

# सडक्या सुपारीच्या संशयावरून दहा व्यावसायिकांच्या गोदामांवर छापे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) नागपुरात अनेक दिवसांपूर्वी इंडोनेशियातून आयात केलेली सुपारी नियमबाह्य पद्धतीने आणल्याच्या संशयावरून सुपारी व्यावसायिकावर कारवाई केली. त्यानंतर आयकर विभागाने बेहिशेबी व्यवहारांच्या संशयावरून तपासणी केली आणि आता राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाला जाग आली असून त्यांनी मागील तीन दिवसांपासून शहरातील विविध भागांत दहा सुपारी व्यावसायिकांच्या गोदामांवर छापे टाकत चार कोटींहून अधिक किमतीची सुपारी जप्त केली. या कारवाईसाठी राज्यातील वेगवेगळ्या विभागांतील तीन अधिकारी नागपुरात ठाण मांडून बसले असून, त्यामुळे मध्य भारतातील सुपारी व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

डीआरआयने इंडोनेशियातून आयात केलेली सुपारी नियमबाह्य पद्धतीने नागपुरात आणल्याच्या संशयावरून अनेक सुपारी व्यवसायिकांवर छापे टाकले होते. त्यामध्ये आयातीदरम्यान कर चुकवेगिरी, बनावट कागदपत्रांचा वापर, किंमत कमी दाखवणे (अंडरव्हॅल्युएशन) आदी बाबींची तपासणी केली होती. त्यानंतर आयकर विभागाने करचोरी आणि बेहिशेबी व्यवहारांच्या संशयावरून या व्यावसायिकांवर कारवाई केली. त्यानंतर मागील तीन दिवसांपासून अन्न व औषध प्रशासन विभागाकडून या व्यापाऱ्यांच्या गोदामावर छापे घातले जात आहेत.

एफडीएमधील सूत्रांच्या माहितीनुसार, भारतात इंडोनेशियातून तामिळनाडूतील एका बंदराद्वारे सडकी सुपारी येते. तेथून ही सुपारी नागपुरात पाठवली जाते. यंदाच्या खेपेमध्ये मोठ्या प्रमाणात सडकी सुपारी नागपुरात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाच्या मुख्यालयाला मिळाली. त्यानुसार एफडीएच्या मुख्यालयाने राज्यातील वेगवेगळ्या भागांतील तीन अधिकाऱ्यांना नागपुरात कारवाईसाठी पाठवले. नागपुरात आलेल्या पथकाने नागपुरातील एफडीएच्या पथकाला सोबत घेत १९ जानेवारी रोजी कळमनातील फार्मिका कोल्ड स्टोरेजमध्ये छापा टाकला. येथे एस.एच. ट्रेडर्स या प्रतिष्ठानची २७ हजार ९२८ किलो (किंमत १ कोटी १० लाख ३९ हजार ४६० रुपये) आणि सुरतच्या श्रीजी इंटरप्रायझेस या प्रतिष्ठानची २६ हजार ७४८ किलो (किंमत १ कोटी ५ लाख ६५ हजार ४६० रुपये) सुपारी जप्त करण्यात आली.

२० जानेवारी रोजी राज गृहउद्योग या प्रतिष्ठानची ७५ लाख रुपयांची तसेच २१ जानेवारीला कोल्ड चेन अँड लॉजिस्टिक आणि सी. एम. कोल्ड स्टोरेजसह इतर ठिकाणी सात ते आठ व्यावसायिकांच्या गोदामांवर छापे टाकण्यात आले. येथे सव्वा ते दीड कोटी रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# दिवंगत सुप्रसिद्ध चंद्रशेखर पाखमोडेंना श्रद्धांजली रविवारी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा यांच्या तर्फे श्रद्धांजली सभेचा कार्यक्रम रविवारी 25 जानेवारीला स्व. कुसुमताई बाबुरावजी झाडे सभागृह नवप्रतिभा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आयुर्वेदिक ले आउट सक्करदरा नागपूर येथे श्रद्धांजलीचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

नागपूर शहरातील सुप्रसिद्ध आणि गरिबांचे कैवारी असलेले न्यूरो सर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे आकस्मिक निधन 31 डिसेंबरला झाले होते. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी श्रद्धांजली सभेचा कार्यक्रम आयोजित केला आहे. याप्रसंगी सभेचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच विशेष उपस्थिती माजी खासदार रामदास तडस यांची राहतील. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार कृष्णाभाऊ खोपडे, शेखर सावरबांधे, तेली समाज सभेचे अध्यक्ष नानाभाऊ ढगे, डॉ. कुणाल पडोळे, डॉ. राजेश सावरबांधे, डॉ. चंद्रशेखर गिल्लुरकर आणि राजेंद्र झाडे यांची उपस्थिती राहतील. श्रद्धांजली सभा दुपारी 2 वाजता. घेण्यात येत असून यावेळी सर्वांना आमंत्रित करण्यात येत आहे. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे संयोजक बळवंतराव मोरघडे यांनी कळविले आहे.

# आत्मनिर्भर भारत व व्हिजनच्या अनुषंगाने वेकोलिमध्ये चिंतन शिबिराचे आयोजन




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर भारत या राष्ट्रीय उद्दिष्टाच्या अनुषंगाने वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (वेकोलि)ची भावी दिशा रेखांकित करण्याच्या उद्देश्याने दि. 23 जानेवारी 2026 रोजी चिंतन शिबिर आयोजित करण्यात आले. भारताच्या व्हिजन 2047 शी सुसंगत अशी वेकोलिची भावी दिशा ठरविणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

या चिंतन शिबिरात कंपनीच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला. तसेच उत्पादन, कोळसा डिस्पॅच, सुरक्षा, खर्च कार्यक्षमता, शाश्वत विकास आणि डिजिटायझेशन या प्रमुख क्षेत्रांना अधिक बळकटी देण्यासाठी स्पष्ट व कालबद्ध कृती आराखड्यावर सखोल चर्चा करण्यात आली. या दूरदृष्टीपूर्ण उपक्रमाचे नेतृत्व जे. पी. द्विवेदी, अध्यक्ष-सह-प्रबंध निदेशक, वेकोलि यांनी केले. यावेळी ी बिक्रम घोष, निदेशक (वित्त); डॉ. हेमंत शरद पांडे, निदेशक (मानव संसाधन); तसेच अजय मधुकर म्हेत्रे, मुख्य सतर्कता अधिकारी यांची उपस्थिती होती.

मुख्यालय व वेकोलिच्या सर्व 10 क्षेत्रांतील सुमारे 125 अधिकारी या शिबिरात सहभागी झाले. यामध्ये क्षेत्रीय महाप्रबंधक, विभागप्रमुख तसेच युवा अधिकारी यांचा समावेश होता, ज्यामुळे विचारमंथन अधिक व्यापक व सर्वसमावेशक झाले. या प्रसंगी सीएमडी जे. पी. द्विवेदी यांनी सांगितले की, कोळसा खाण क्षेत्रात वेकोलिला भारताच्या व्हिजन 2047 शी सुसंगत बनविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब, कोळशाची उत्कृष्ट गुणवत्ता आणि उच्च परिचालन कार्यक्षमता अत्यंत आवश्यक आहे.

त्यांनी स्पष्ट केले की उत्पादकता वाढविणे, प्रक्रिया सुलभ करणे, यांत्रिकीकरणाला चालना देणे आणि आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणे यांद्वारे वेकोलि परिचालन कार्यक्षमता अधिक मजबूत करत आहे. तसेच खर्च-परिणामकारक कार्य, संसाधनांचा विवेकी वापर आणि अनावश्यक खर्चावर नियंत्रण यांना प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. परिवर्तन व्यवस्थापन या संकल्पनेवर भर देत त्यांनी सांगितले की, प्रत्येक अधिकारी व कर्मचारी परिवर्तन प्रक्रियेचा भाग बनल्यासच संस्था अधिक सक्षम, गतिमान आणि स्पर्धात्मक होऊ शकते.

निदेशक (वित्त) बिक्रम घोष यांनी आपल्या भाषणात सामूहिक प्रयत्न, सकारात्मक दृष्टिकोन आणि नवोपक्रम यांच्या माध्यमातून वेकोलि भविष्यात उच्च कार्यक्षम व भविष्यसज्ज संस्था म्हणून उभारी घेईल, असा विश्वास व्यक्त केला. निदेशक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे यांनी वेकोलिच्या सध्याच्या व भावी योजनांची सविस्तर माहिती दिली. बदलत्या परिस्थितीत वेकोलिमध्ये माहिती तंत्रज्ञान व डिजिटल साधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढविण्याची गरज असल्यावर त्यांनी भर दिला.
या वेळी मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे यांनीही आपले विचार मांडले.

चिंतन शिबिरादरम्यान विविध क्षेत्रीय महाप्रबंधाकांकडून एकूण 10 प्रेजेंटेशन करण्यात आली. यामध्ये व्हिजन 2047 साठीचा आराखडा, भूमिगत उत्पादन योजना, गुणवत्ता नियंत्रण, डिस्पॅच, एफएमसी, सुरक्षा, भू-संपादन व पुनर्वसन, पर्यावरण व वन परवाने, डिजिटायझेशन व एआयचा वापर, मानव संसाधन, वित्त आणि करार व्यवस्थापन अशा विविध विषयांचा समावेश होता. प्रत्येक सत्रानंतर प्रश्नोत्तर सत्र आयोजित करण्यात आले, ज्यामध्ये सीएमडी, सर्व निदेशकांनी आणि मुख्य सतर्कता अधिकारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. खुल्या मंचावर विचार व सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# राष्ट्रनायक नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना महावितरणतर्फे अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचे झंझावात 'नेताजी' सुभाषचंद्र बोस आणि मराठी अस्मितेचा बुलंद आवाज हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त महावितरणच्या नागपूर परिमंडलात या दोन्ही महान सुपुत्रांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

काटोल रोडवरील 'विद्युत भवन' या मुख्यालयात आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रप्रेम आणि समाजहिताचा वारसा जपण्याचा संकल्प करण्यात आला. मुख्य अभियंता दिलिप दोडके, अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य आणि संजय वाकडे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले. यावेळी कार्यकारी अभियंता समीर शेंद्रे, महाव्यवस्थापक (वित्त) अतुल राऊत, वरिष्ठ व्यवस्थापक सुधीर टेकाम, सचिन लहाने आणि योगेश विटनकर उपस्थित होते. केवळ औपचारिकता म्हणून नव्हे, तर नेताजींचा 'शिस्तबद्ध लढा' आणि बाळासाहेबांची 'निर्भीड वृत्ती' यांचा आदर्श समोर ठेवून काम करण्याची प्रेरणा यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या अधिकारी, अभियंत्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी दोन्ही प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून आपल्या भावना व्यक्त केल्या.

# ९३८ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ९३८ वाहन चालकांवर कारवाई करून २,४५,९०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये १ व एनडीपीएस अन्वये २ अशा ३ प्रकरणात ३ आरोपींवर कारवाई करून १,७७० रुपयांचा माल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये ४ प्रकरणात १० आरोपींवर कारवाई करून एकूण ३,३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.